अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य, जुनी प्रशासकीय इमारत, २ रा मजला,
पुणे-४११ ००१
दुरध्वनी ०२०-२६१२ ४८१५/ फॅक्स ०२०-२६१२ ५८७८
adgprison.pune@home.maharashtra.gov.in

**परिपत्रक**

जा.क्र.शेती/कर्तव्यसूची/ CE22 / २०१३-१४/ कक्ष-७ (शेती) दि. ०५/१०/२०१३

**विषय :- कारागृह विभागातील कृषी सहाय्यक व कृषी पर्यवेक्षक यांची कर्तव्यसूची.**

.कारागृह विभागाकडे कार्यरत असलेल्या कृषी सहाय्यक व कृषी पर्यवेक्षक या पदाकरीता कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या दहा सदस्यीय समितीने **कर्तव्य व जबाबदा-या** निश्चित केलेल्या असुन, त्याची प्रत पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. सदर कर्तव्य व जबाबदा-यांची संबंधीतांना जाणीव करुन देण्यात यावी.

4/10/13.

**(मीरां चड्डा बोरवणकर)**
**अपर पोलीस महासंचालक व**
**कारागृह महानिरीक्षक**
**महाराष्ट्र राज्य पुणे-१**

**प्रति,**

**अधीक्षक,म.का.** येरवडा/कोल्हापूर/औरंगाबाद/नाशिकरोड/नागपूर/अमरावती/ठाणे
**जि.का.** सांगली/सातारा/ विसापूर/ धुळे / परभणी/उस्मानाबाद/ बीड/नांदेड/ अकोला/भंडारा/ चंद्रपूर/ यवतमाळ/बुलढाणा/वर्धा,**खुलेजि.का.** येरवडा/पैठण/ मोर्शी खु.जि.का / खुली वसाहत आटपाडी/वि.का.रत्नागिरी

**प्रत-** **कारागृह उपमहानिरीक्षक**, पूर्व विभाग, नागपूर//पश्चिम विभाग, पुणे/मध्य विभाग औरंगाबाद/दक्षिण विभाग, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषीत

## कारागृहाकडील कृषी सहायक यांचे कामकाजाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या
## (महाराष्ट्र कारागृह नियमावली १९७९ प्रकरण ६ सहित )

१. कारगृहाचे आवश्यकतेनुसार प्रक्षेत्रावरिल पिकांच्या उत्पादनाचा हंगामाप्रमाणे आराखडा तयार करुन वरीष्ठ कार्यालयास सादर करणे . तसेच आपत्कालीन पिक उत्पादन नियोजन करणे .

२. उत्पादन आराखडयानुसार प्रक्षेत्रावरिल मशागतीची व पिक उत्पादनाची सर्व कामे वेळेत पुर्ण करणेबाबत संबधीत रक्षकांना व बंदयांना मार्गदर्शन करुन त्यांचे मार्फत कामे करवुन घेणे.तसेच मजुर व आवश्यक सामग्री उपलब्धतेबाबत अधीक्षक किंवा वरिष्ठ तुरुंग अधिकारी यांना अवगत करणे.

३. पिक उत्पादनाकरिता आवश्यक साधन सामुग्री उदा. बि-बियाणे,खते, शेती अवजारे खरेदी व दुरुस्ती बाबत विहीत लेखा पद्वतीचा अवलंब करुन अधीक्षकांच्या मान्यतेने कार्यवाही करणे .

४. कारागृह प्रक्षेत्रावर उत्पादित शेतमाल वितरणाचे/विक्रीचे नियोजन करणे तसेच अतिरिक्त शेती उत्पादन अधीक्षक यांचे मान्यतेने इतर कारागृहास पुरवठा करणे किंवा स्थानिक बाजारात चालू भावाप्रमाणे विक्री करणे .

५. कारागृह प्रक्षेत्रावरिल शेती कामकाज उत्पादन खर्च कमी करुन अधिक उत्पादन काढणेसाठी तंत्रज्ञानानुसार पिक पद्वतीचा अवलंब करणे.

६. कारागृहातील पशुसंवर्धन व इतर कृषी पुरक उद्योगांचे नियोजन करणे, संगोपन करणे.

७. शेती विषयक सर्व अभिलेख, नोंदवहया अदयावत ठेवून पुरक अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे.सर्व संबंधीत विवरणपत्रके वेळेत सादर करणे.

८. कारागृह प्रक्षेत्रावरील शेती उत्पादनाबाबत शासनाच्या विविध योजनांचा समन्वय राखुन अंमलबजावणी करणे.

९. कारागृहाकडील अनावश्यक, शेतीची निरुपयोगी साधनसामग्री लेखापदधतीचा अवलंब करून निर्लेखित करणे.

१०. शेती प्रक्षेत्रावरील नविन वृक्षारोपनाचे नियोजन करणे ,अस्तित्वात असलेल्या वृक्षांची जोपासना करणे,नैसर्गिक आपत्तीने झालेल्या नुकसानीचे निर्लेखन करणे.

११. शेती संबधी ७/१२ उतारे, नकाशे व इतर कागदपत्रे अद्यावत ठेवणे.

१२. बंदी शेत कामासाठी कामचुकारपणा करतात, सांगितलेली कामे करीत नाहीत, शेतमालाचे नुकसान करतात अशा परिस्थितीत संबंधीत बंदयांचा अहवाल रजिष्टर क्र. १३ मार्फत अधीक्षक यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर करणे.

१३. कारागृह उत्पन्न वाढविण्यासाठी वर्षभरातील पिकाबाबत नियोजन करुन त्यास अधीक्षकांची मान्यता घेणे.

१४. कारागृह उत्पन्न कमी निघत असल्यास त्याचा अभ्यास करुन कारणमीमांसेसह अहवाल अधीक्षकांना सादर करणे.

## कारागृहाकडील कृषी पर्यवेक्षक यांचे कामकाजाचे कर्तव्य व जबाबदा-या

## (महाराष्ट्र कारागृह नियमावली १९७९ प्रकरण ६ सहित )

१. ज्या ठिकाणी कृषी सहायक पद रिक्त आहे किंवा अस्तित्वात नाही. अशा ठिकाणी कृषी पर्यवेक्षक यांनी कृषी सहायक यांचे कर्तव्य व जबाबदारी नुसार कामकाज करावे.

२. ज्या ठिकाणी कृषी सहायक पद भरलेले आहे त्या ठिकाणी कृषी पर्यवेक्षक यांनी खालीलप्रमाणे कामे करावीत.

अ) कारागृहाचे आवश्यकतेनुसार प्रक्षेत्रावरिल पिकांच्या उत्पादनाचा हंगामाप्रमाणे आराखडा तयार करुन वरीष्ठ कार्यालयास सादर करणे . तसेच आपत्कालीन पिक उत्पादन नियोजन करणे .

ब) पिक उत्पादनाकरिता आवश्यक साधन सामुग्री उदा. बि-बियाणे,खते, शेती अवजारे खरेदी व दुरुस्ती बाबत विहीत लेखा पद्वतीचा अवलंब करुन अधीक्षक यांचे मान्यतेने कार्यवाही करणे .

क) कारागृह प्रक्षेत्रावर उत्पादित शेतमाल वितरणाचे / विक्रीचे नियोजन करणे.तसेच अतिरिक्त शेती उत्पादन अधीक्षक यांचे मान्यतेने इतर कारागृहास पुरवठा करणे किंवा स्थानिक बाजारात चालू भावाप्रमाणे विक्री करणे .

ड) कारागृह प्रक्षेत्रावरिल शेती कामकाज उत्पादन खर्च कमी करुन अधिक उत्पादन काढणेसाठी तंत्रज्ञानानुसार पिक पद्वतीचा अवलंब करणे.

इ) शेतीविषयक सर्व अभिलेख, नोंदवहया अदयावत ठेवून पुरक अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. सर्व संबंधीत विवरणपत्रके वेळेत सादर करणे.

ई) शेती विभागातील दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवुन शेतीची कामे वेळेत पुर्ण होतील याची दक्षता घेणे.

उ) कृषी पर्यवेक्षक यांनी कृषीसहाय्यक यांना वेळोवेळी मार्गदर्शन करुन त्यांचे समन्वयाने कारागृह शेतीचे उत्पादन वाढविणे.

ऊ) बंदी शेत कामासाठी कामचुकारपणा करतात, सांगितलेली कामे करीत नाहीत, शेतमालाचे नुकसान करतात अशा परिस्थितीत कृषी सहाय्यकांनी संबंधीत बंदयांचा रजिष्टर क्र. १३ मार्फत केलेला अहवाल शिफारशी सहित अधीक्षक यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

३. कारागृह उत्पन्न वाढविण्यासाठी वर्षभरातील पिकाबाबत नियोजन करुन त्यास अधीक्षकांची मान्यता घेणे.

४. कारागृह उत्पन्न कमी निघत असल्यास त्याचा अभ्यास करुन कारणमीमांसेसह अहवाल अधीक्षकांना सादर करणे.

## तंत्र अधिकारी (कारागृह शेती) यांचे कर्तव्य व जबाबदा-या

१. कारागृह निहाय शेती उत्पादन आराखडा तपासणे.

२. राज्यातील कारागृह प्रक्षेत्रास तांत्रीक मार्गदर्शनासाठी वेळोवेळी भेटी देणे.

३. केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांचे कारागृह प्रक्षेत्रावर अंमलबजावणीचे नियोजन व पाठपुरावा करणे.

४. कारागृह शेती आधुनिकीकरणासाठी पायाभुत सुविधा व साधन सामुग्री व यंत्रसामुग्री खरेदीबाबत शासनास पत्र व्यवहार करणे.

५. कारागृह प्रक्षेत्रावरील शेती उत्पादन खर्च कमी करुन वाढीव उत्पादन काढणेसाठी शिफारशीनुसार व सुधारित तंत्रज्ञानानुसार पिक शेती पध्दती अवलंबनाबाबत क्षेत्रीय कर्मचा-यांना मार्गदर्शन करणे.

६. कारागृह स्तरावरील शेती कामकाज करणा-या अधिकारी/कर्मचारी वर्गास वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करणे तसेच आढावा सभा घेणे.

७. कारागृह शेती संबंधी सर्व अहवाल व पत्रव्यवहार संकलीत करणे व कार्यवाही करणे.

अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य, जुनी प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे-१
दुरध्वनी ०२०-२६१२ ४८१५/ फॅक्स ०२०-२६१२ ५८७८
adgprison.pune@home.maharashtra.gov.in

Despatched on 11/10/13

## परिपत्रक

जा.क्र.शेती/ ८६६४ / २०१३-१४/ कक्ष-७ (शेती) दि. ११/१०/२०१३

कारागृह प्रक्षेत्राची वेळीच मशागत होणे आवश्यक आहे. यामुळे शेती उत्पादनावर निश्चितच परिणाम होत असतो. ज्या कारागृहांना ट्रॅक्टर सुविधा आहे त्यांनी वेळेत नांगरट व कोळपणी करुन पेरणीयोग्य क्षेत्र करणे गरजेचे आहे.तथापि ज्या कारागृहाकडे ही सुविधा नाही त्यांनी उपलब्ध बैलजोडीने प्राधान्याने वेळीच मशागत करणे आवश्यक आहे. मात्र ब-याच वेळा प्रयत्न करुन देखील वेळीच मशागत होत नाही. ज्यामुळे बरेच क्षेत्र पडीक राखले जाते.

सबब खरीप व रब्बी हंगामाचे सुरुवातीस प्रसंगी भाडयाच्या ट्रॅक्टरने कंत्राट पध्दतीने नांगरट व इतर मशागत कामकरणेसाठी दरपत्रके मागवुन लेखा पध्दतीनुसार अधीक्षक यांनी त्यांचे वित्तीय अधिकारात कार्यवाही करावी. त्याचबरोबर या कामी आवश्यकतेनुसार संबंधित कारागृह उपमहानिरीक्षक यांचे वित्तीय अधिकाराचा देखील वापर करावा. कारागृह उपमहानिरीक्षक यांचे स्तरावरुन आढावा सभेत कारागृह प्रक्षेत्राची वेळेत मशागत झाली किंवा कसे याची माहिती घ्यावी. जेणे करुन लागवडी योग्य क्षेत्र पडीक राहणार नाही.

11/10/13.

**(मीरां चड्डा बोरवणकर)**
**अपर पोलीस महासंचालक व**
**कारागृह महानिरीक्षक**
**महाराष्ट्र राज्य पुणे-१**

**प्रति,**

**अधीक्षक,म.का.**येरवडा/कोल्हापूर/औरंगाबाद/नाशिकरोड/नागपूर/अमरावती/ठाणे
**जि.का.** सांगली/सातारा/ विसापूर/ धुळे / परभणी/उस्मानाबाद/ बीड/नांदेड/
अकोला/भंडारा/ चंद्रपूर/ यवतमाळ/बुलढाणा/वर्धा,**खुलेजि.का.** येरवडा/पैठण/
मोर्शी खु.जि.का / खुली वसाहत आटपाडी/वि.का.रत्नागिरी

**प्रत- कारागृह उपमहानिरीक्षक**, पूर्व विभाग, नागपूर//पश्चिम विभाग, पुणे/मध्य विभाग औरंगाबाद विभाग औरंगाबाद/दक्षिण विभाग, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषीत

अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य, जुनी प्रशासकीय इमारत, २ रा मजला, पुणे-१
दुरध्वनी ०२०-२६१२ ४८१५/ फॅक्स ०२०-२६१२ ५८७८
adgprison.pune@home.maharashtra.gov.in

**परिपत्रक**

जा.क्र.शेती/ ८७६३ / २०१३-१४/ कक्ष-७ (शेती) दि. ३० /१०/२०१३

**विषय :- कारागृहाकडील अनावश्यक जनावरांबाबत.**

कारागृह विभागाकडील अनावश्यक जनावरांचे संगोपन करुन नाहक खर्च वाढविण्यापेक्षा खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. कारागृहाकडील शेती कामास व दुग्ध व्यवसायास योग्य असलेली परंतु कारागृहास अनावश्यक असलेल्या जनावरांचे कारागृह उपमहानिरीक्षक यांचे मान्यतेने इतर कारागृहाच्या आवश्यकतेनुसार हस्तांतरण करावे.

२. वरीलप्रमाणे इतर कारागृहास जनावरांची आवश्यकता नसल्यास विहित लेखा पध्दतीचा अवलंब करुन अनावश्यक जनावरांची लिलावाव्दारे विक्री करावी.

३. लिलावाव्दारे विक्री न झालेली तसेच शेती कामास व दुग्ध व्यवसायास अयोग्य असलेली अनावश्यक जनावरे जिल्हयातील गोशाळेस किंवा पांजरपोळ संस्थेस विनामूल्य दान करावीत. जनावरांच्या विल्हेवाटीनंतर नोंदवहयातुन पशुधनाचे रितसर निर्लेखन करावे.

स्वातीसाठे
**(स्वाती साठे)** 30/10/2013
प्र.अपर पोलीस महासंचालक व
कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य पुणे-१

**प्रति,**

**अधीक्षक**,**म.का**.येरवडा/कोल्हापूर/औरंगाबाद/नाशिकरोड/नागपूर/अमरावती/ठाणे
**जि.का.** सांगली/सातारा/ विसापूर/ धुळे / परभणी/उस्मानाबाद/ बीड/नांदेड/ अकोला/भंडारा/ चंद्रपूर/ यवतमाळ/बुलढाणा/वर्धा,**खुलेजि.का.** येरवडा/पैठण/ मोर्शी खु.जि.का / खुली वसाहत आटपाडी/वि.का.रत्नागिरी/कि.सु.का. नाशिक

**प्रत-** **कारागृह उपमहानिरीक्षक**, पूर्व विभाग, नागपूर//पश्चिम विभाग, पुणे/मध्य विभाग औरंगाबाद/दक्षिण विभाग, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य, जुनी प्रशा. इमारत, २ रा मजला, पुणे-०१
दुरध्वनी ०२०-२६१२ ४८१५/ फॅक्स ०२०-२६१२ ५८७८
adgprison.pune@home.maharashtra.gov.in

# परिपत्रक

जा.क्र. शेती/शेतमाल विक्री /२०१४ कक्ष-७ (शेती) पुणे-१ दिनांक /०३/२०१५

कारागृह प्रक्षेत्रावर उत्पादित माल गरजेनुसार वापर करुन शिल्लक माल नजीकच्या कारागृहास पुरवठा करावा. तरीही माल शिल्लक राहत असल्यास स्थानिक/नजीकचे बाजारपेठेत विक्री करणेबाबत मुख्यालयाचे परिपत्रक क्र. ४६६४, दि. १०/७/२०१३ अन्वये कळविण्यात आले. तथापि यानुसार कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. सबब याबाबत खालीलप्रमाणे पुनःश्च निर्देश देण्यात येत आहेत.

१. उत्पादित शेतमालाचा गरजेनुसार वापर करुन शिल्लक माल नजीकचे कारागृहास पाठवावा. ज्या कारागृहास माल पाठविला जाईल त्या कारागृहाने अग्रक्रमाने माल स्वीकारणे बंधनकारक आहे. आवश्यकतेनुसार सदरची कार्यवाही विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांचे समन्वयाने करावी.

२. वरीलप्रमाणे कार्यवाही करुनही माल शिल्लक राहत असल्यास स्थानिक/नजीकचे बाजार समितीमार्फत विक्री करावी. मात्र कोणत्याही परिस्थितीत माल वाया जाणार नाही याची दक्षता घ्यावी. बाजार समितीमार्फत मिळणारा दर मुख्यालयाने ठरविलेल्या दरापेक्षा [illegible] मालाची वेळेत विल्हेवाट लागुन कारागृह उत्पन्नात वाढ होणार आहे.

३. बाजार समितीत माल विक्रीस पाठविण्यापूर्वी तेथील विक्री कार्यपध्दतीची माहिती करुन घ्यावी ज्यामुळे कोणत्याही संभाव्य अडचणी उद्भवणार नाहीत.

४. कारागृह अधीक्षकांनी व्यक्तीशः वरीलप्रमाणे सर्व बाबी नियंत्रित कराव्यात.

(मीरां चढ्ढा बोरवणकर)
अपर पोलीस महासंचालक व
कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रति,
अधीक्षक,
मध्यवर्ती/जिल्हा/खुले कारागृह (सर्व)

प्रत :- १. विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), दक्षिण विभाग, मुंबई
२. कारागृह उपमहानिरीक्षक (सर्व)

अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य, जुनी प्रशा. इमारत, २ रा मजला, पुणे-०१
दुरध्वनी ०२०-२६१२ ४८१५/ फॅक्स ०२०-२६१२ ५८७८
adgprison.pune@home.maharashtra.gov.in

# परिपत्रक

जा.क्र. शेती/लिलाव/1621/२०१५-१६/कक्ष-७(शेती)पुणे-१ दि. ६/५/२०१५

सद्यस्थितीत काही कारागृह आवारातील व प्रक्षेत्रावरील फळ झाडे/मासेमारी लिलाव पध्दतीने विक्री करण्यात येत होती. तथापि सर्व कारागृहात लिलाव प्रक्रियेत एकसूत्रता रहावी म्हणुन **लिलाव कार्यपध्दती मार्गदर्शक सूचना** तयार करण्यात आल्या आहेत. **(प्रत सोबत जोडली)**

तरी सदर मार्गदर्शक सूचनेप्रमाणे सर्व कारागृहाचे आवारात असणा-या फळझाडांचे तसेच शेती क्षेत्र असलेल्या प्रक्षेत्रावरील फळ झाडे/मासेमारीचा लिलाव करण्यात यावा. यानुसार प्रत्यक्षात लिलाव प्रक्रिया पुर्ण झालेनंतर कार्यवाहीचा अहवाल मुख्यालयास सादर करावा. मात्र कोणत्याही परिस्थितीत लिलाव प्रक्रिया वेळेत पुर्ण होईल व कारागृह उत्पन्नात वाढ होईल याची दक्षता घ्यावी.

**सोबत :- वरीलप्रमाणे.**

6.5.15

**(मीरां चड्डा बोरवणकर)**
अपर पोलीस महासंचालक व
कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य पुणे-१

**प्रति,**

अधीक्षक,
मध्यवर्ती/जिल्हा/खुले कारागृह (सर्व),
रत्नागीरी विशेष कारागृह,
संपर्क अधिकारी, स्वतंत्रपूर खुली वसाहत आटपाडी, जि. सांगली

**प्रत :-** १. विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), दक्षिण विभाग, मुंबई
२. कारागृह उपमहानिरीक्षक (सर्व)

## लिलाव कार्यपध्दती मार्गदर्शक सूचना

कारागृह आवारातील व प्रक्षेत्रावरील फळझाडांचा, मासेमारीचा किंवा इतर बाबींची लिलाव पध्दतीने विक्री करणेसाठी एकसुत्रता रहावी म्हणुन खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. लिलाव प्रक्रिया सुरु करणपूर्वी कृषी विद्यापीठाकडुन फळांचे व इतर बाबींचे तसेच मत्स्य विभागाकडुन मासेमारीचे मूल्यमापन करुन **अपेक्षित न्यूनतम किंमत** ठरविणे आवश्यक आहे. सदरची माहिती गोपनीय ठेवण्यात यावी जेणेकरुन अपेक्षित रक्कमेपेक्षा लिलावापोटी जादा उत्पन्न मिळु शकेल.

२. लिलावापासून अपेक्षित उत्पन्न रु. २५,०००/- चे आत असल्यास लिलाव प्रक्रियेची नोटीस /जाहिरात प्रसिध्दी स्थानिक पातळीवरील प्रमुख कार्यालये व लिलाव धारकांना परिपत्रकाव्दारे कळविण्यात यावे. जेणेकरुन लिलाव प्रक्रियेत सहभाग वाढुन चांगला प्रतिसाद मिळेल.

तथापि लिलावापासून अपेक्षित उत्पन्न रु. २५,०००/- पेक्षा जास्त असल्यास वर्तमानपत्रातुन जाहिरात प्रसिध्द **(सोबत नमुना जोडला)** करुन विहित लेखा पध्दतीचा अवलंब करुन निविदेव्दारे लिलाव करावा.

३. लिलाव प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करावी.

**अ. जिल्हा कारागृह:-** अधीक्षक - अध्यक्ष, तुरुंग अधिकारी वर्ग-१ किंवा २ - सदस्य, कृषी सहायक/कृषी सेवक - सदस्य सचिव, वरिष्ठ लिपीक- सदस्य,कृषी सहायक/कृषी सेवक पद रिक्त असल्यास किंवा पद मंजुर नसल्यास कृषी विद्यापीठ किंवा कृषी विभागाचे प्रतिनिधी - निमंत्रित सदस्य, मासेमारी लिलावासाठी मत्स्य विभागाचे प्रतिनिधी- निमंत्रित सदस्य

**ब. मध्यवर्ती कारागृह :-** अधीक्षक-अध्यक्ष, तुरुंग अधिकारी वर्ग-१- सदस्य, कृषी पर्यवेक्षक/कृषी सहायक - सदस्य सचिव, प्रशासन अधिकारी- सदस्य, कृषी सहायक/कृषी पर्यवेक्षक पद रिक्त असल्यास कृषी विद्यापीठ किंवा कृषी विभागाचे प्रतिनिधी -निमंत्रित सदस्य, मासेमारी लिलावासाठी मत्स्य विभागाचे प्रतिनिधी- निमंत्रित सदस्य

**क. खुले कारागृह :-** अधीक्षक - अध्यक्ष, तुरुंग अधिकारी २ - सदस्य, कृषी पर्यवेक्षक/कृषी सहायक/कृषी सेवक- सदस्य सचिव, वरिष्ठ लिपीक- सदस्य, कृषी पर्यवेक्षक/कृषी सहायक/कृषी सेवक पद रिक्त असल्यास किंवा पद मंजुर नसल्यास कृषी विद्यापीठ किंवा कृषी विभागाचे प्रतिनिधी -निमंत्रित सदस्य,मासेमारी लिलावासाठी मत्स्य विभागाचे प्रतिनिधी- निमंत्रित सदस्य

लिलावाची तारीख किमान ८ दिवस अगोदर संबंधीत कारागृह उपमहानिरीक्षक व मुख्यालयास कळवुन लिलाव प्रकिया पुर्ण करावी. मात्र अपेक्षित लिलावाची **न्यूनतम** रक्कम रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यास कारागृह उपमहानिरीक्षक यांचे प्रतिनिधी तर अपेक्षित

लिलावाची **न्यूनतम** रक्कम रु. १,००,०००/- पेक्षा जास्त असल्यास मुख्यालयामार्फत तंत्र अधिकारी (शेती) उपस्थित राहतील. मात्र काही अपरिहार्य कारणामुळे वरील अधिकारी अनुपस्थितीत राहिल्यास लिलाव स्थगित करु नये.

४. लिलावापासून अपेक्षित उत्पन्नापेक्षा जास्त मूल्य प्राप्त होण्यासाठी तसेच अल्प प्रतिसादामुळे किंवा अन्य कारणांमुळे लिलावाची तारीख पुढे ढकलावी लागेल या बाबी गृहीत धरुन योग्यवेळी लिलाव प्रक्रिया सुरु करणे आवश्यक आहे. लिलावधारकांना मालाची पाहणी करणेसाठी पुरेसा अवधी दयावा.

५. लिलाव प्रक्रियेतील लिलावधारकांकरीता कारागृहाच्या आवश्यकतेनुसार अटी/शर्ती व करारपत्र तयार करणेसाठी सोबतचे नमुना करारपत्राचा आधार घ्यावा. सदर करारपत्रात कारागृहाचे सोयीप्रमाणे **काही अटी/शर्ती बदलता येतील**. (सोबत प्रत जोडली)

६. लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी निविदा अर्ज व त्यासोबत अटी शर्ती कारागृह कार्यालयात (लिलावाची अपेक्षित **न्यूनतम** रक्कम रु. २५,०००/- चे आत असल्यास **रु.२००/-** व रु. २५,०००/- वरील रक्कमेस **रु. ५००/-**) भरुन कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील.

७. तसेच लिलावापूर्वी अनामत रक्कम (लिलावाच्या अपेक्षित **न्यूनतम** रक्कमेच्या **१०%** रक्कम) रोखीने भरणा करावी. लिलाव मंजुर झालेल्या ठेकेदाराव्यतिरिक्त इतरांची अनामत रक्कम लिलाव समाप्तीनंतर परत करण्यात येईल.

## वर्तमानपत्रात लिलावाबाबत प्रसिध्द करावयाचा नमुना मसूदा.

मध्यवर्ती/जिल्हा/खुले कारागृह ---------- येथील प्रक्षेत्रावर असलेल्या चिंच/आंबा/इ. फळझाडांच्या --------- (संख्या) झाडांच्या लिलाव प्रकरणी दि.---------- ते दि. --------- या कालावधीत सकाळी ११.०० ते ४.०० पर्यंत मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा दि.----------- रोजी ----------- वाजता अधीक्षक मध्यवर्ती/जिल्हा/खुले कारागृह --------- यांचे कार्यालयात उघडण्यात येतील.

तरी इच्छुकांनी निविदा फॉर्म व लिलावाच्या अटी शर्ती संबंधी तसेच झाडांची पाहणी करणेसाठी वरील कार्यालयात सुट्टीचे दिवस सोडुन कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

अधीक्षक,
मध्यवर्ती/जिल्हा/खुले कारागृह-------

## **करारपत्र**

**लिहुन घेणार** : अधीक्षक मध्यवर्ती/जिल्हा/खुले कारागृह ------

**लिहुन देणार :** मी श्री. ------------ राहणार ---------- फळझाड लिलावासाठी खालील नमुद नियम व अटी शर्तीस अधीन राहत आहे.

१. सदर लिलावाची मुदत दि. --------- ते -------- पर्यंत असुन तद्नंतर लिलावधारकाचा फळावर हक्क राहणार नाही. तसेच लिलाव फळाव्यतिरिक्त इतर कोणत्याही झाडावर व्यापा-याचा हक्क राहणार नाही.

२. ठेकेदार राखणीसाठी रखवालदार ठेवणार असल्यास त्यास ओळखपत्र देणे आवश्यक.

३. ठेकेदार किंवा त्यांचे व्यक्तीकडुन कारागृह बगीचातील फळ झाडांचे किंवा इतर झाडांचे नुकसान करु नये अन्यथा नुकसान भरपाई देण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदारावर राहिल.

४. फळ झाडांची निगा उदा. पाणी, खते, फवारणी इ. व्यवस्थापन लिलावाचे तारखेपर्यंत कारागृह विभागाकडुन केले जाते. तद्नंतर या बाबी गरजेनुसार ठेकेदाराने कराव्यात.

५. फळ झाडाचे कोणत्याही नैसर्गिक किंवा इतर कारणाने नुकसान झाल्यास लिलावापोटी कारागृहास एकदा जमा केलेली रक्कम कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही याची मला जाणीव असुन याबाबत मी कोणताही दावा करणार नाही.

६. लिलाव कालावधीत चोरीची घटना घडल्यास ठेकेदाराने परस्पर पोलीस तक्रार नोंदवुन या कार्यालयास माहितीस्तव कळवावे. याबाबत कारागृह प्रशासन जबाबदार राहणार नाही.

७. लिलावात सहभाग घेणेसाठी अनामत रक्कम भरणे आवश्यक असुन सिलबंद निविदा उघडल्यानंतर सर्वाधिक निविदा रक्कमेवर अनामत भरलेल्या व्यक्तींनाच पुन:श्च बोली पध्दतीत भाग घेता येऊ शकेल. मात्र सर्वाधिक निविदा रक्कमेपुढे पुढील बोली न झाल्यास लिलाव मंजुर/नामंजुर/फेर लिलाव प्रक्रिया करण्याचा सर्वस्वी अधिकार कारागृह प्रशासनाचा राहिल.

८. लिलाव मंजुर ठेकेदाराने लिलावाची जास्तीत जास्त रक्कम तातडीने व उर्वरित रक्कम ७ ते ३० दिवसात भरणा केल्यानंतरच फळ तोडणीस परवानगी देण्यात येईल. मुदतीत रक्कम न भरल्यास अनामत रक्कम जप्त केली जाईल.

९. कोणत्याही कारणास्तव लिलाव रद्द झाल्यास किंवा लिलाव पुढे ढकलल्यास अनामत रक्कम परत करण्यात येईल. मात्र या रक्कमेवर कोणतेही व्याज आकारता येणार नाही.

१०. लिलावधारक किंवा त्यांचे व्यक्तीकडुन कारागृहाच्या सुरक्षिततेस बाधा आणणार नाही.

अधीक्षक (सही) ठेकेदार नाव (सही)

दोन साक्षीदाराचे नाव,पत्ता व सही

अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य, जुनी प्रशा. इमारत, २ रा मजला, पुणे-०१
दुरध्वनी ०२०-२६१२ ४८१५/ फॅक्स ०२०-२६१२ ५८७८
adgprison.pune@home.maharashtra.gov.in

## परिपत्रक

जा.क्र. शेती/गु.प्र.चर/४६८३ /२०१५-१६/कक्ष-७(शेती)पुणे-१ दि. ६/५/२०१५

कारागृह शेती क्षेत्राचे संरक्षण करणेसाठी गुरे प्रतिबंधक चर (Trench cum Mond) तयार करणेबाबत मुख्यालयाचे परिपत्रक क्र. ८४४५, दि.२७/९/२०१३ अन्वये कळविण्यात आले होते. तथापि प्रक्षेत्रास संरक्षित भिंत किंवा तारेचे कुंपन नाही अशा कारागृहामार्फत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. सबब याबाबत खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

कारागृह प्रक्षेत्रासभोवती गुरे प्रतिबंधक चर तयार करणेचे काम जिल्हाधिकारी यांचे मदतीने जिल्हा नियोजन विकास समितीच्या (DPDC) निधीतुन जे.सी.बी. चे सहाय्याने टप्प्याटप्प्याने पूर्ण करुन घ्यावे. जेणेकरुन प्रक्षेत्रासभोवतीच्या तटभिंतीचा प्रश्न कायमस्वरुपी सुटु शकेल. या कामी स्थानिक वन विभागाचे देखील मार्गदर्शन घेण्यास हरकत नाही. तरी त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

**सोबत :- गुरे प्रतिबंधक चराबाबत तांत्रिक मार्गदर्शन.**

**(मीरां चड्डा बोरवणकर)**
अपर पोलीस महासंचालक व
कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य पुणे-१

**प्रति,**
अधिक्षक,येरवडा,कोल्हापूर,नागपूर,अमरावती,ठाणे,औरंगाबाद,नाशिक रोड,विसापूर, धुळे,परभणी, अकोला, भंडारा,चंद्रपूर, यवतमाळ, बुलढाणा,वर्धा, वाशिम,नंदुरबार उस्मानाबाद,बीड,अहमदनगर मध्यवर्ती /जिल्हा कारागृह/पैठण,मोर्शी, येरवडा,खु.जि.का.स्वतंत्रपूर खुली वसाहत आटपाडी.

**प्रत :-** १. विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), दक्षिण विभाग, मुंबई
२. कारागृह उपमहानिरीक्षक (सर्व)

**(मागे पहा)**